खे.ता.शि.प्र.मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## वाणिज्य मंडळ (Commerce Association)

## 2022-23 / सत्र १

## अहवाल

दिनांक :- 26/12/2022

शैक्षणिक वर्ष 2022-23 च्या प्रथम सत्रातील वाणिज्य मंडळाचे कामकाज पुढील पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

वाणिज्य शाखेमध्ये प्रथम वर्ष वर्गामध्ये 202 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. तसेच द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 198 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे आणि तृतीय वर्ष वाणिज्य वर्गामध्ये 190 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.तसेच पदव्युत्तर विभागामध्ये 60 (एम.कॉम.) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत पुढील काही उपक्रम घेण्यात आले.

27 सप्टेंबर 2022 रोजी लेखा आणि कर प्रणाली क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय चंद्रशेखर कदम( Ex -Deputy Commissioner of GST-Pune) हे होते. सदर कार्यक्रमांमध्ये 132 विद्यार्थी आणि पाच प्राध्यापक उपस्थित होते.

दिनांक 7 आक्टोंबर 2023 रोजी व्यावसायिक अर्थशास्त्र (सुक्ष्म) या विषयाचा सेमिनार आयोजित करण्यात आला व दिनांक 13 ऑक्टोंबर 2023 रोजी व्यावसायिक अर्थशास्त्र (समग्र) या विषयाचा सेमिनार आयोजित करण्यात आला. हे दोन्हीही उपक्रम विषय शिक्षक प्रा. शिवम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थितरित्या पार पाडले.

10 ऑक्टोबर 2022 रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गासाठी Business Communication या विषयावर विद्यार्थी चर्चासत्र घेण्यात आले. या उपक्रमामध्ये 73 विद्यार्थी उपस्थित होते व त्यातील पंधरा विद्यार्थ्यांनी आपापले

सादरीकरण केले. सदर उपक्रम हा विषय शिक्षक प्रा.अभिजीत बेंडाले यांच्या मार्गदर्शाखाली व्यवस्थितरित्या पार पाडला.

11 ऑक्टोबर 2022 रोजी तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी अंकेक्षण या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले या चर्चासत्रामध्ये 94 विद्यार्थी उपस्थित होते तर त्यापैकी 39 विद्यार्थ्यांनी आपापल्या विषयावर आपापले सादरीकरण केले.सदर उपक्रम हा विषय शिक्षक प्रा.अभिजीत बेंडाले यांच्या मार्गदर्शाखाली व्यवस्थितरित्या पार पाडला.

15 ऑक्टोबर 2022 रोजी प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गासाठी बँक व्यवसाय आणि वित्तपुरवठा या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रथम वर्ष वाणिज्य वर्गातील 90 विद्यार्थी उपस्थित होते. उपक्रम हा विषय शिक्षक प्रा. गदादे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थित रित्या पार पाडला गेला.

15 ऑक्टोबर 22 रोजी प्रथम वर्ष वाणिज्य वर्गासाठी सहकार या विषयावर विद्यार्थ्यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या उपक्रमांमध्ये देखील 50 विद्यार्थी उपस्थित होते. सदर उपक्रम हा विषय शिक्षिका प्रा. इनामदार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थित रित्या पार पाडला.

वाणिज्य विभागाच्या वतीने तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण व्हावी व सद्भावना टिकून राहावी यासाठी नोव्हेंबर महिन्यामध्ये तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी एक विद्यार्थी एक झाड हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांच्या मार्फत वृक्षारोपण करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना आपापल्या घरी किंवा आपापल्या मालकीच्या ठिकाणी एक झाड लावून त्याबद्दलचा अहवाल वाणिज्य विभागात जमा करावयास सांगितला होता त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांनी आपण लावत असलेल्या वृक्षासोबतचा फोटो आणि अहवाल विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे समन्वयक प्रा. अभिजीत बेंडाले यांच्याकडे जमा केला.

वाणिज्य मंडळाच्या अंतर्गत वरील सर्व उपक्रम हे महाविद्यालयाचे प्राचार्य आणि वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडले.

यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाबद्दल विशेष ज्ञान मिळावे यासाठी विद्यार्थ्यांच्या विषयानुसार क्षेत्रभेट आयोजित करण्यात येतील.

K.T.S.P. Mandal's
Sahebraoji Buttepatil Mahavidyalaya
Rajgurunagar,Tal.Khed,Dist.Pune.

प्रा.ए.जे.बेंडाले